दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १३३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.६ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध विकासकामांचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कोरोना वैश्विक महामारी आणि महाड येथील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी यंदा आपला वाढदिवस साजरा करणार नसल्याचे जाहीर केले. आणि त्या अनुषंगाने माझ्या वाढदिवसाला हारतुरे, पुष्पगुच्छ, जाहिरात, बॅनर्स यावर खर्च करण्याऐवजी आपणही शक्य तेवढी मदत वा निधी जमा करून पूरग्रस्तांना मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले होते. त्या आवाहनाला भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच विविध संस्था, संघटना तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आहेत.**



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी मोठ्या प्रमाणात समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. यानिमित्ताने भव्य दिव्य स्वरूपाचे महाआरोग्य शिबिर याशिवाय अभिष्टचिंतन सोहळाचे आयोजन केले जाते. खांदा वसाहतीतील सि.के.टी महाविद्यालय परिसरात कार्यकर्ते शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. या दिवशी पनवेलमध्ये उत्सवाचे स्वरूप दरवर्षी प्राप्त होते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आणि प्रेमाखातर पक्षाचे कार्यकर्ते हितचिंतक मोठ्या प्रमाणात बॅनर आणि फलक लावतात. ठिकाणी होर्डिंग्ज उभारण्यात येतात. दरम्यान अगोदरच आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त बुके न घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्याऐवजी पुस्तके ते दरवर्षी वाढदिवसानिमित्त स्वीकारतात. दरम्यान गेल्या वर्षी सुद्धा कोरोना वैश्विक संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला नाही. यंदाही महामारीचे सावट कायम आहे. त्याचबरोबर काही दिवसांपूर्वी अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी महाप्रलय आला. महाडमध्ये दरड कोसळून जीवित हानी झाली. अनेकांचे संसार वाहून गेले होत्याचे नव्हते झाले त्यामुळे या वर्षी सुद्धा आपला वाढदिवस साजरा करू नये असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्त्यांना केले. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे बुके हारतुरे घेऊन येऊ नयेत त्याचबरोबर बॅनर आणि जाहिरातीवर सुद्धा खर्च टाळावा, त्याऐवजी जितके शक्य होईल तितकी मदत पूरग्रस्तांना करावी असे आवाहन त्यांनी केले होते. त्या अनुषंगाने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच विविध संस्था आणि नागरिकांकडून महाड पूरग्रस्तांना मदत सेवा केली जात आहे.

महाड या ठिकाणी आलेल्या महापुरामुळे मोठ्या प्रमाणात या परिसराचे नुकसान झाले. दरड कोसळून काहींचा मृत्यू झाला. दरम्यान आमदार प्रशांत ठाकूर आणि लागलीच पूरग्रस्त भागामध्ये धाव घेतली. येथील नागरिकांना धीर आणि आधार देण्याचे काम केले. इतकेच नाही तर तातडीने मदतीचा ओघ सुरु केला. अन्नछत्राच्या माध्यमातून दररोज सहा हजार नागरिकांना जेवण बनवण्याचे काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली खाली अखंडपणे सुरु झाले. शासन, प्रशासनाचा एकही अधिकारी त्या ठिकाणी पोहोचला नव्हता त्यापूर्वीच आमदार प्रशांत ठाकूर हे राज्य व केंद्रातील नेते मंडळींसोबत आणि जिल्ह्यातील युवकांची फौज घेऊन महाडकरांच्या मदतीसाठी धावून गेले आणि एवढेच नाही तर मदतकार्यासाठी तेथेच तळ ठोकून बसले. कोरडा अन्नधान्य, तयार भोजन, पाणी, अल्पोआहार, मेडिकल किट, कपडे, चादर, ब्लँकेट, टॉवेल, असे विविध सामुग्री देण्याबरोबरीनेच महाडमधील चिखलाचे साम्राज्य दूर करण्यासाठी यंत्रसामुग्री आणि मनुष्यबळ पुरवून तात्काळ त्यांनी महाडकरांसाठी मदत कार्य सुरु केले. आणि आजही ते कार्य अखंडपणे सुरु आहे.

कार्यसम्राट लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. ०५) विविध विकासकामांचे लोकार्पण व भुमिपूजन तसेच इतर सामाजिक कार्यक्रम पार पडले. त्यामध्ये विचुंबे येथील शिवम कॉम्प्लेक्स ते ग्रीन व्हॅली पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन, केवाळे गावात अंतर्गत गटारे बांधणे कामाचे भुमिपूजन, दुदरे ते शिवणसई रस्त्याचे उदघाट्न, रिटघर येथे नारायण उसाटकर ते दत्तमंदिर पर्यंत अंतर्गत रस्ता व गटार करणे कामाचे भूमिपूजन झाले. तसेच हरिग्राम ठाकूरवाडी येथे गरिब व गरजूंना तालुका युवा मोर्चाच्या वतीने ब्लँकेट वाटप करण्यात आले.

भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमास उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी नेते एकनाथ देशेकर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोशल मिडिया तसेच दूरध्वनीद्वारे शुभेच्छा!

वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा, सहकार, क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांनी सोशल मिडिया तसेच दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री शंभूराज देसाई, माजी पालकमंत्री रविंद्र चव्हाण, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश बालदी, आमदार रवीशेठ पाटील, आमदार सुभाष भोईर, आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार सुभाष चव्हाण, तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा, सहकार, क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांनी सोशल मिडिया तसेच दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले.



## संक्षिप्त...

### अखेर एमपीएससीच्या सदस्यांच्या तिघांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांच्या तीन रिक्त पदांवरील नियुक्तीस राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी मान्यता दिल्यानुसार तीन सदस्यांच्या नेमणुकीच्या अधिसूचना आज जारी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांच्या रिक्त पदांवरील नियुक्तीला मान्यता देण्याबाबत बुधवारी सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपाल कोश्यारी यांची भेट घेतली होती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी डॉ. देवानंद बाबुराव शिंदे, डॉ. प्रताप रामचंद्र दिघावकर आणि राजीव रणजीत जाधव यांची या अधिसूचनेनुसार नियुक्ती करण्यात आली आहे. यावर प्रतिक्रिया देताना भरणे म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी पोलीस उपनिरीक्षक परीक्षा (४९६ पदे), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा (१ हजार १४५ पदे), महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा परीक्षा (४३५ पदे), महाराष्ट्र वनसेवा परीक्षा (१०० पदे), महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा परीक्षा (१६ पदे) याप्रमाणे एकूण २ हजार १९२ पदांसाठी एकूण ६ हजार ९९८ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र झालेले आहेत. त्यापैकी ३७७ उमेदवारांच्या मुलाखती झाल्या असून उर्वरित ६ हजार ६२१ उमेदवारांच्या मुलाखती होणे बाकी आहे. आता या सदस्य नियुक्तीमुळे या भरतीप्रक्रियेला वेग येणार असून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना दिलासा मिळणार आहे. सामान्य प्रशासन राज्यमंत्री भरणे म्हणाले, केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या लोकसेवा आयोगाची सदस्य संख्या वाढवण्याच्या अनुषंगानेही राज्यपाल कोश्यारी यांच्यासमवेत बैठकीत चर्चा झाली आहे. आयोगाच्या एक सदस्यांचा कार्यकाल लवकरच पूर्ण होत असून त्यांची रिक्त होणारी जागा भरण्यासाठीही लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे राज्यपालांना सांगितले.

# काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रासह देशात पुन्हा उभारी देण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे : प्रदेशाध्यक्ष नाना पटोले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रासह देशात पुन्हा उभारी देण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे हे संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करताना दिसून येत आहे. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह असून जनता सुद्धा भाजपाच्या कार्यपद्धतीला वैतागली आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रासह संपूर्ण देशात काँग्रेस पुन्हा उभारी घेईल व २०२४च्या निवडणुकीत काँग्रेस पुन्हा सत्तेत आलेला दिसेल असा ठाम विश्वास आज पनवेल येथील काँग्रेस कार्यालयात उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

आजच्या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह माजी मंत्री नसीम खान, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, मुंबई प्रदेशाध्यक्ष आ. भाई जगताप, किसान सेलचे उपाध्यक्ष पांडे, प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे, जिल्हाध्यक्ष आर.सी. घरत, कामगार नेते महेंद्र घरत, कार्याध्यक्ष सुदाम पाटील, नंदलाल मुंगाजी, ताहिर पटेल, नोफिल सय्यद, महिला आघाडीच्या निर्मला म्हात्रे, शशिकला सिंह, शहराध्यक्ष लतिफ शेख, महादेव कटेकर, विश्वजित पाटील, मोहन गायकवाड, माजी उप नगराध्यक्ष आबा खेर, भारती चौधरी, मंजूळा कातकरी, मिलिंद पाडगावकर, अविनाश लाड, राजीव चौधरी, प्रविण कांबळे, त्र्यंबक केणी, मोरे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले की, भाजपाने मोठमोठे आश्वासने देऊन सत्ता काबीज केली व आता लोकांना भाजपाचे खरे रूप दिसू लागले आहे. त्यामुळे अनेक भाजपचे पदाधिकारी हे काँग्रेसच्या संपर्कात आहेत. आगामी काळात याची झलक पहायला मिळेल. पनवेलमध्ये होणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व राहणार आहे. यासाठी काँग्रेस पक्षाचे मंत्री पनवेलकडे जास्तीत जास्त लक्ष देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोकण दौऱ्यात पूरग्रस्तांची भेट घेतली. त्यांना हव्या असलेल्या गोष्टी राज्य शासनाकडे व वेळ पडल्यास केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून मिळवून देणार आहे. सध्या राज्य सरकारने दिलेले पॅकेज हे समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यपालांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर .../२

# महिंद्रा सॅनिओ कारखान्यातील कामगारांचा वाद चिघळला

## प्रवेश व्दारासमोरील आंदोलन पोलीस बळाचा वापर करून उधळला, कामगारांना पांगविले ; मनसे आक्रमक

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरात सन-१९६० साली पोलदनिर्मीती करणाऱ्या (महिंद्रा) महिंद्र सॅनिओ या नामांकित कारखान्यातील कामगारांना कायद्याने मिळणारे कामगार हक्क व सेवा सुविधांपासून वंचित ठेवल्याने या कामगारांनी आपल्या अन्यायाला वाचा फुटावी म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना युनियनचे एकूण २५० कामगारांनी नेतृत्व ३ ऑगस्ट रोजी स्विकारले असताच दुसऱ्याच दिवशी ४ ऑगस्ट रोजी याच युनियनमधील जवळपास ४३ कामगारांना कंपनी व्यवस्थापनाने अचानकपणे कामावरून काढल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होताच सर्व कामगारांनी मनसे नेत्यासह कंपनी गेटसमोर ठिय्या आंदोलन सुरू केल्याने दुसऱ्या दिवशी व्यवस्थापनाने पोलीस बळाचा वापर करीत मनसे नेत्यांना ताब्यात घेऊन गेट वरून कामगारांना हटविण्यात आल्याने आता पुन्हा मनसे विरुद्ध व्यवस्थापन असा संघर्ष पाहवयास मिळणार आहे. .../२



# सिक्कीमच्या मुख्यमंत्र्याची सिडको भवनला सदिच्छा भेट

## खारघर येथील सिक्कीम भवन भूखंडाची केली पाहणी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनी ०५ ऑगस्ट २०२१ रोजी सिडको भवनला भेट देऊन सिडको महामंडळाकडून सिक्कीम भवनाच्या उभारणीकरिता निश्चित करण्यात आलेल्या, नवी मुंबईतील खारघर येथील ४००० चौ.मी. च्या भूखंडाचीही पाहणी केली. या भेटीवेळी त्यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्याकडे सदर भूखंड सिक्कीम सरकारला प्रदान केल्याबद्दल सिडको तसेच महाराष्ट्र शासनाप्रति आभार व्यक्त केले. सिडकोकडून नवी मुंबईच्या खारघर नोडमधील भूखंड क्र. १९ आणि २० सिक्कीम भवनच्या उभारणीकरिता प्रदान करण्यात आले आहेत.




आपल्या भेटी दरम्यान प्रेमसिंग तमांग यांनी नवी मुंबईतील संधानता (कनेक्टिव्हिटी), सार्वजनिक परिवहन, पर्यावरण, आरोग्य आणि सामाजिक सुविधा क्षेत्रांत होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाबद्दल .../२

# म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत ८ हजार २०५ सदनिकांसाठी सोडत : डॉ.जितेंद्र आव्हाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत ८ हजार २०५ सदनिकांसाठी सोडत काढण्यात येणार आहे अशी माहिती गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी मुंबईतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. सोडतीची जाहिरात २३ ऑगस्ट २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार असून १४ ऑक्टोबर २०२१ रोजी सोडत काढण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.



सोडतीमध्ये समाविष्ट एकूण सदनिकांपैकी अत्यल्प उत्पन्न गटासाठी ७० %, अल्प उत्पन्न गटासाठी २७ % (म्हणजेच ९७ % अत्यल्प व अल्प गटासाठी) घरे उपलब्ध होतील. अर्जाची किंमत ५६० रुपये (मूळ किंमत ५०० + ६० जी एस टी = रू.५६०/-) असेल. अर्जासमवेत भरावयाची अनामत रक्कम अत्यल्प उत्पन्न गटासाठी ५ हजार रुपये,अल्प उत्पन्न गटासाठी १० हजार रुपये,मध्यम उत्पन्न गटासाठी १५ हजार रुपये तर उच्च उत्पन्न गटासाठी २० हजार रुपये इतकी असेल.

प्रवर्ग निहाय उत्पन्न मर्यादा (मासिक) अत्यल्प उत्पन्न गटासाठी २५ हजार .../२

# सिडकोकडून २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले कांदळवनांचे महत्त्व लक्षात घेता, कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण आणि संवर्धन व्हावे या उद्देशाने सिडको महामंडळाकडून आपल्या अधिकारक्षेत्रातील, रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील कामोठे येथील १३४.३० हेक्टर, पनवेल येथील ३८.४६ हेक्टर व कोल्हे-खार येथील १०९ हेक्टर, अशा एकूण २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे ०५ ऑगस्ट २०२१ रोजी वन विभागाच्या कांदळवन कक्षाला हस्तांरण करण्यात आले.

श्रीमती निनू सोमराज, उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई विभाग, श्री. डी. एस. कुकडे, वनक्षेत्रपाल, नवी मुंबई तसेच श्री. सतिशकुमार खडके, अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांनी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली सदर हस्तांरण प्रक्रिया पार पाडली. श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको व इतर अधिकारी हे देखील या प्रसंगी उपस्थित होते.

जमिनीची धूप होण्यापासून वाचवण्यासह पुराचे पाणी व वादळाला अटकाव करण्यामध्ये कांदळवने महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच अनेक पशू-पक्षी व जलचरांचा कांदळवनांमध्ये अधिवास असतो. हे लक्षात घेऊन कांदळवनांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून कांदळवन क्षेत्र अधिसूचित करून, सिडकोकडून उपरोक्त कांदळवन क्षेत्राचा ताबा कांदळवन कक्षाला देण्यात आला.

**किनारी भागांकरिता संरक्षक म्हणून कांदळवनांचे महत्त्व असल्याने, कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण व्हावे याकरिता सिडकोने आपल्या अधिकारक्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे वन विभागाकडे हस्तांतरण केले आहे. नवी मुंबई क्षेत्रात येणारे महत्वाकांक्षी प्रकल्प लक्षात घेता सिडकोचा हा निर्णय नवी मुंबईच्या पर्यावरण रक्षणासाठी व वाढीसाठी फायदेशीर ठरणार आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# चंद्रकांत पाटील आजच 'राज'दरबारी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना भाषणाच्या क्लिप पाठवल्याने दोन्ही पक्षाची युती होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, राज ठाकरे यांनी आपण चंद्रकांत पाटील यांना भाषणाच्या क्लिप पाठवल्याच नसल्याचा दावा केला. त्यानंतर, चंद्रकांत पाटील यांनी राज ठाकरेंची भेट घेणार असल्याचं सांगितलं होतं. त्यानुसार, आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील उद्याच म्हणजे शुक्रवार ६ ऑगस्ट रोजी राज ठाकरेंना भेटणार आहेत.

राज ठाकरेंना भेटण्यासाठी उद्या सकाळी ११.३० वाजता कृष्णकुंजवर बंगल्यावर मी जात आहे. ही सदिच्छा भेट असणार असून दोन राजकीय नेते जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा राजकारणावर चर्चा होते, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. राज ठाकरेंची परप्रांतीयांबाबतची भूमिका यासंदर्भात मी चर्चा करण्यासाठी त्यांना भेटणार आहे. सध्या युतीचा कुठलाही प्रस्ताव नाही, मी एकटा निर्णय करणारा नाही. आमच्याकडे तीन निर्णयकर्ते आहेत, असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष यांच्यात चर्चा होणार असल्याचे समजते. मात्र, युतीचा कुठलाही प्रस्ताव नसून ही मैत्रीपूर्ण भेट आहे. उद्याच्या भेटीच विचारांचे आदान-प्रदान होणार असल्याचं पाटील यांनी म्हटलं आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या माझे अशिल श्री.निखिल रसिकलाल माखेचा यांच्या संपूर्ण व एकमेव मालकी हक्क, अधिकार व कब्जेवहिवाटीतील मिळकती आहेत.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**तालुका : पनवेल, जि.रायगड यांच्या**
**हद्दीतील असलेली खालील वर्णनाची मिळकत**

| मौजे / गाव | सर्व्हे नं. |
|---|---|
| वारदोली | ४१/१, ४१/३, ४१/४, १०९/४ |
| वाजापूर | ६/१, ६/२, ६/३, ११ |
| देवद | ६० |
| पनवेल | ७३/अ ३+४+१ ब |
| पालीबुद्रुक | ९३/0 |

तमाम जनतेस सावधान केले जाते की, सदर मिळकतींबाबत माझे अशिलांच्या संमतीशिवाय कोणत्याही अन्य इसमांबरोबर वर नमूद केलेल्या मिळकतींची खरेदी-विक्री, हस्तांतरण, तारण, गहाण, बक्षिस, अदलाबदल किंवा तत्सम अन्य कोणत्याही प्रकारचा करार-मदार अथवा व्यवहार करू नये. असा कोणताही करार-मदार अथवा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर व अवैध असा राहील व सदरचा व्यवहार हा माझे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसे झाल्यास माझे अशिल अशा सर्व इसमांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

दि.०६/०८/२०२१

**सही/-**
**स्मिता म्हात्रे**
**(वकील)**
**१४७, द्वारकादास रतनशी मेन्शन, कलेक्टर ऑफिस जवळ, ठाणे (प.) ४००६०१**
**फोन नं.०२२-२५३४१९२९**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रासह देशात पुन्हा उभारी देण्याची ताकद...

त्यांनी नाराजी व्यक्त केली. याप्रसंगी माजी मंत्री नसिम खान यांनीसुद्धा भाजप सरकारवर टिका करून आता सर्वत्र काँग्रेसमय वातावरण झाले असून आगामी सर्व निवडणुकीत पूर्ण ताकद लावून लढणार असल्याचे त्यांनी सांगून पनवेलकडे विशेष लक्ष देणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी लवकरच पनवेलमध्ये कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले.

## महिंद्रा सँनिओ कारखान्यातील कामगारांचा वाद चिघळला

खोपोलीतीला महिंद्र सँनिओ या नामांकित कारखान्यात मोठ्या प्रमाणात कामगार काम करीत असून कायमस्वरूपी व कंत्राटी कामगार १२ ते १५ वर्षापासून काम करीत असताना काही कामगारांवर कंपनी व्यवस्थापन आणि ठेकेदार दबाव टाकत अन्याय करीत असताना या कामगारांना समान काम, समान वेतन मिळत नसून या कामगारांचे कंपनी व्यवस्थापनाकडून सेवा सुविधा वंचित ठेवल्याने आपल्या अन्यायाला वाचा फुटावी म्हणून जवळपास २५० कामगारांनी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्यावर प्रेरीत होऊन महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे प्रतिनिधित्व महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना संयुक्त सरचिटणीस सचिन गोळे यांच्या उपस्थितीत मंगळवारी ३ ऑगस्ट स्विकारले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी ४ ऑगस्ट रोजी कंपनी व्यवस्थापनाने याच युनियमनमधील जवळपास ४३ कामगारांना अचानकपणे कामावरून काढल्याने ४ ऑगस्ट रोजी पहिल्या पाळीसाठी आलेल्या कामगारांना कंपनी गेटच्या बाहेर काढल्याने कामगारांनी तीव्र संताप व्यक्त केला. कामगारावर न्याय मिळावा म्हणून मनसे नेत्यांनी आक्रमक पवित्रा घेत कंपनी गेट समोर ठिय्या आंदोलन करित कामगारांना कामावर रूजू करू घ्या अशी मागणी केली. या मागणी साठी कामगार संघटनेचे सरचिटणीस सचिन गोळे ही तातडीने कंपनी गेट समोर येऊन कामगारांमध्ये सामील होत रात्रभर बसून राहिले आणि कामगारांना लवकरात लवकर कामावर रूजू करून न घेतल्यास मनसे आक्रमक पवित्रा घेणार असल्याचे जाहीर केले या कारखाना प्रवेशद्वारासमोर कामगार व कामगार नेते बसून राहिल्याने कारखान्यातील उत्पादन प्रक्रिये साठी येणारा माल व बनवून झालेला मालाच्या वाहने बंद झाल्याने त्याचा परिणाम उत्पादन प्रक्रिये वर झाल्याने व्यवस्थापनाने पोलीस बळाचा वापर करीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कामगार संघटना सरचिटणीस सचिन गोळे यांच्यासह परशुराम साळवी, विश्वास दर्गे, अनिल मिंडे, महेश सोगे, अविनाश देशमुख, सतिष येरूनकर, संदीप पाटील, रमेश राणे, नितेश खाडे, निलेश राणे, सुनील आवरे, संजय ठोबरे या मनसे नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन कामगारांच्या जमावाला पांगविण्यात व्यवस्थापनाने यश मिळविले तयामुळे तूर्तास कारखाना प्रवेशव्दारा समोरील संघर्ष थांबला असला तरी मनसे विरुद्ध व्यवस्थापन हा संघर्ष पाहवयास मिळणार आहे.

## सिक्कीमच्या मुख्यमंत्र्याची सिडको भवनला सदिच्छा भेट

प्रशंसोद्गार काढले. महाराष्ट्र आणि सिक्कीममधील सहकार्याचे हे पर्व वृद्धिंगत व्हावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडकोतील यांसह कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, के. गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), प्रशांत भांगरे, पणन व्यवस्थापक (वाणिज्यिक), सिडकोतील अन्य विभाग प्रमुख आणि सिक्कीम सरकारचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग म्हणाले की, सिक्कीम भवनच्या उभारणीसाठी देण्यात आलेल्या या भूखंडामुळे लवकरात लवकर सिक्कीम भवनाचे काम मार्गी लागेल. सिक्कीम भवनाच्या उभारणीमुळे कर्करोगाच्या उपचारांसाठी मुंबई आणि नवी मुंबईमध्ये येणाऱ्या सिक्कीममधील गरजू नागरिकांच्या निवाऱ्याची सोय होणार आहे. कधीकाळी दुर्लक्षित असलेल्या प्रदेशाचे रूपांतर नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये करून शहरातील जमिनीचे मूल्य वाढवण्यासाठी सिडकोने केलेल्या प्रयत्नांचाही मी मनापासून कौतुक करतो. यावेळी डॉ.संजय मुखर्जी म्हणाले की, सामाजिक उद्देशांकरिता भूखंड देण्यास सिडकोने आपल्या स्थापनेपासूनच प्राधान्य दिले आहे. सिक्कीम भवनाच्या उभारणीनंतर, येथे येणाऱ्या सिक्कीमच्या नागरिकांची निवासाची व्यवस्था होण्याबरोबरच महाराष्ट्र आणि सिक्कीम यांमध्ये एक अनोखा सांस्कृतिक व जिव्हाळ्याचा बंध प्रस्थापित होणार आहे.

## ८ हजार २०५ सदनिकांसाठी सोडत : डॉ.जितेंद्र आव्हाड

रुपये पर्यंत,अल्प उत्पन्न गटासाठी २५ ते ५० हजार रुपये पर्यंत,मध्यम उत्पन्न गटासाठी ५० हजार ते ७५ हजार रुपये पर्यंत तर उच्च उत्पन्न गटासाठी ७५ हजार रुपये पेक्षा जास्त अशी असेल. संपूर्ण सोडत पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी उच्चस्तरीय देखरेख समिती गठीत असून त्यांच्या उपस्थितीत प्रक्रिया पूर्ण होणार आहे.सोडतीमध्ये अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम त्यांच्या खात्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने परतावा करण्यात येईल. या योजनेतून उपलब्ध होणारी घरे ही ठाणे जिल्ह्यातील शिरढोण, खोणी, भंडार्ली, गोठेघर, मिरारोड येथे, पालघर जिल्ह्यातील विरार बोळींज व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे आहेत. राज्यातील एकंदर घरांची मागणी लक्षात घेता तसेच पुणे येथील सोडतीचे यश पाहून म्हाडातर्फे आगामी काळात नाशिक, नागपूर, अमरावती, पुणे, औरंगाबाद अशा विभागीय शहरांमध्ये १० हजार घरांची निर्मिती करण्यात येईल व ही घरे दर्जेदार असतील अशी माहितीही गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड यांनी दिली. राज्यातील जनतेला जास्तीत जास्त घरे उपलब्ध करण्याच्या दृष्टीने,त्यांना केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ देण्यासाठी लवकरच ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्यासह नवी दिल्लीत केंद्रीय नगरविकास मंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही मंत्री डॉ.आव्हाड यांनी सांगितले. वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन झाल्यानंतर लगेचच दुसऱ्याच दिवशी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे व येत्या ३ वर्षात वरळी बीडीडी चाळीचे चित्र बदललेले असेल असा विश्वासही गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला. यावेळी म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. नितीन महाजन उपस्थित होते.

# पेण रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी सचिन शिगवण

**दै.रायगड नगरी । पेण**

रोटरी क्लब ऑफ पेणच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध उद्योजक सचिन शिगवण तर सचिवपदी माजी सैनिक मिलिंद बोचरे यांची निवड करण्यात आली आहे.

पेणच्या गांधी मंदिर येथे पदग्रहण सोहळ्या प्रसंगी त्यांनी सूत्रे स्वीकारली. नवीन कार्यकारणीत तरुणांना संधी देण्यात आली आहे, कोरोना काळात रोटरी क्लब पेणने आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे, डॉक्टर अनिल परमार, डॉक्टर विष्णू म्हात्रे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सोहळ्या प्रसंगी मान्यवर मंडळींचा सत्कार करण्यात आला.

माजी अध्यक्ष संयोजिता टेमघरे व सचिव जयेश शहा यांनी कोरोना काळात सर्व पदाधिकारी व सदस्य यांना घेऊन उत्तम काम केल्या बद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

---

श्री.भाकरे सा़े.कोर्ट

अ‍ॅड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.४४३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०८/२०२१

१) सौ.कल्पना विलास शिंदे
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विलास परशुराम शिंदे
वय : ६२ वर्षे, व्यवसाय :
दोघे रा.फ्लॅट नं.एफ-२३३, सहावा मजला,
इकोनॉमिक्स टाईप, बिल्डींग, एफ ब्लॉक,
रघुनाथ विहार, आर्मी वेल्फेअर सोसायटी,
सेक्टर १४, खारघर, नवी मुंबई,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार १ व अर्जदार नं.२ यांचा मुलगा कै.श्री.अभिजीत विलास शिंदे यांचे दि.१५/१२/२०२० रोजी डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे अपघाती निधन झाले आहे. कै.श्री.अभिजीत विलास शिंदे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ.मालमत्ता परिशिष्ट (अचल मालमत्ता)**

**फ्लॅट नं.एफ-२३३, सहावा मजला, इकोनॉमिक्स टाईप, बिल्डींग, एफ ब्लॉक, रघुनाथ विहार, आर्मी वेल्फेअर सोसायटी, सेक्टर १४, खारघर, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०**

**एकूण क्षेत्रफळ : १११०.00 चौ.फूट, बिल्टअप व स्टील कार पार्कींग स्पेस क्र.सी.पी./एफ 0३ क्षेत्र १२१.२६ चौ.फूट**

**मालमत्ता मुल्यांकन : ७०,००,०००/- (अक्षरी रु.सत्तर लाख)**

**५० टक्के भाग : रु.३५,००,०००/- (अक्षरी रु.पस्तीस लाख)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.५/८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सा़े

प्रो.जमा.६-२५ — अर्जदाराचे वकील अ‍ॅड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सा़े. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९७०/२०२१
ने.ता.०९/०९/२०२१

१) श्रीमती.मंजुळा तुकाराम भोईर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुरेखा विलास भगत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.ललिता सखाराम पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.अशोक मुकूंद जोशी चे वारस
४/१) कु.प्रतिक्षा अशोक जोशी
वय : २३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.प्रियंका जयश पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्रियिंका अशोक जोशी
वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.विठाबाई नागू जोशी ही दि.१७/०५/२०१९ रोजी मौजे ए/१०३, श्री सुर्यकूंद महापुरुष को.ऑप.हौ.सो. गनपावडर रोड, मझगाव, मुंबई येथे तीचे राहत्या घरी मृत्यू पावली असून तीचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भेंडखळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| भेंडखळ ९/८६ | ३५४ | - | ११-८९-00 |

कै.विठाबाई नागू जोशी हिचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## PUBLIC NOTICE

Be it known to the General Public my client **MR. ANIKET GOPICHAND KHERATKAR** is owner of immoveable property bearing Flat No. D-04, Tulsi Vihar Co-op. Housing Society Ltd, Akurli, Tal -Panvel, Dist - Raigad which has been purchased from Mr. Gunvantrao M. Chawan & Mr. Vasudev M. Chawan.

That he has lost and or misplaced and not traceable the Original Share Certificate bearing No.04 Shares Nos. 31 to 40 issued by Tulsi Vihar Co-op. Housing Society Ltd and accordingly my client has lodged the Complaint on 05/08/2021 at Khandeshwar Police Station, New Panvel under Lost Property Registration No.1064/2021.

It is informed that not to use the above document for any purposes. If it is misused strict legal action will be initiated. If any person or persons found the said document, kindly be return to undersigned, proper charges will be paid to the concern person. It is further informed that after the period of 15 days from Notice no claim of whatsoever will be entertain.

Date : 05/08/2021

Sd/-
**KUSUM KIRAN GHARAT**
**Advocate & Notary (Govt. Of India)**
Shop No.1, Hemkunj Building, Plot No.22, Sector - 8, Near Bank Of India, Khanda Colony, New Panvel, Navi Mumbai 410206.
Ph. No. 9967335046

---

अ‍ॅड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६८१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०८/२०२१

श्रीमती.हाशी घोष व इतर २ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व ३ यांचे वडील कै. श्री.आखिल कृष्णा घोष हे दि.१८/११/२०१९ रोजी खारघर तालुका : पनवेल येथे मयत झाले. श्री.आखिल कृष्णा घोष यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मालमत्ता परिशिष्ट**
**सीएच २/३५, केंद्रीय विहार, सेक्टर ११,**
**खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण क्षेत्रफळ : ७५.७५ चौ.मी.**
**मालमत्ता मुल्यांकन : १६,००,०००/- (अक्षरी रुपये सोळा लाख मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.५/८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कामोठे नोड, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाचा भूखंड आमचे अशिल श्री.आकाश रामराव करमळकर व सौ.स्मिता आकाश करमळकर, पत्ता : ४०३, ड्रिम लॅड, प्लॉट नं.३५, सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्रिपक्षीय करार करण्यात विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे नोड, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| मेसर्स निलकल्प डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.चिंतन नरेंद्रभाई मकवाना २) श्री.कल्पेश ठक्कर ३) श्री.निलेश रुखाना | २८ | १९ | ९९.८९ |

सबब वर नमूद भूखंडावर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजावून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०६/०८/२०२१

**सही/-**
**अ‍ॅड.करण रघुनाथ देशमुख**
**पत्ता : १०१, खोडाल धाम, प्लॉट नं.५३, सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७०२५०९०९९**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : खारकोलेटी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये एकूण क्षेत्रापैकी ०.२५.४० इतके क्षेत्रास श्री.सुनील सुदाम इंगळे यांचे नाव नमूद असून सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काने व ताबेकब्जाने असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे अशिलांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे, तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता आमचे अशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारकोलेटी, ता.पेण, जि.रायगड**

| मौजे | गट विभाग/ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खारकोलेटी | ५४/२/१ | 0-४५-१० पो.ख. 0-00-५0 एकूण क्षेत्र 0-४५-६0 या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी 0-२५-४0 इतके क्षेत्राकरिता | ५.३९ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेली सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही, असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०५/०८/२०२१

**सही/-**
**(रसिक वि. कोठेकर)**
**वकील**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप. हौ.सोसा., टिळक रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९५६१९१९१११**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ट्रकच्या धडकेत एका पादचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव वेगाने ट्रक चालवून एका पादचाऱ्याला धडक मारुन त्यात तो गंभीररित्या जखमी झाल्याने मयत झाल्याची घटना पनवेल जवळील चिंचवण गावाच्या हद्दीत घडली आहे.

चिंचवण गावाच्या हद्दीतील नाल्यावरील ब्रिजवरुन आरोपी मेहबुब खान ट्रक चालक हा भरधाव वेगाने जात असताना त्याने रमेश कातकरी (४०) याला धडक मारुन त्यात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शिवशक्ती मित्र मंडळानी केली पूरग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शिवशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील खेड व परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष गोविंदा सुतार , प्रवीण पोवार, संतोष तळेकर, प्रशांत नरसाळे, समीर कदम ,कुमार पडवळ, नीलेश समेळ, अनिकेत जाधव, जयंवत दसवडकर, यांच्या नेतृत्वाखाली खेड येथे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आमदार योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली खेड येथे व जेथे जेथे गरज आहेत त्याची माहिती घेऊन नगरसेविका सीमा वंडकर यांच्यासह वाटप करण्यात आले.



## काशिद ग्रामपंचायतीतर्फे शेतकऱ्यांना मोफत खत वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे सर्वे, चिकणी व काशिद गावातील शेतकऱ्यांना मोफत खताचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार–खेडेकर, उपसरपंच मधुरी धार्वे, सदस्य विलास मोरे, अंकुश चाचे, संतोष राणे,वर्षा दिवेकर,निलम म्हाडिक, जान्हवी दिवेकर,शुभ्रा कासार,तुळसा पवार, नरेश धार्वे आदी. मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी शेतकऱ्यांना मोफत युरीया खताचे वाटप करण्यात आले. मुरुड तालुका कृषी विभागाचे कृषी सहायक आदिराज चौलकर व कृषी मित्र सुशील खोपकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कस्टम विभागाने जप्त केलेले कंटेनर फोडून लाखो रूपयांचा माल लंपास

### सीएफएसच्या ढिसाळ व्यवस्थापनामुळे गोदामात अनेक वेळा चोऱ्या ; न्हावा शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

कस्टम विभागाने पकडलेल्या मालाची चोरी झाल्याची घटना जेएनपीटीच्या स्पीडी गोदामामध्ये घडल्याने पुन्हा एकदा खळबळ माजली आहे. पाच कंटेनर फोडून त्यातील लाखो रूपयांचा माल चोरण्यात आला आहे. या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. कर चुकवून किंवा अनधिकृत पणे आयात केलेला माल कस्टम विभागाने पकडल्यास हा माल सोनारी येथिल स्पिडी सिएफएस मध्ये ठेवण्यात येतो. मात्र कडेकोट बंदोबस्त असून देखिल हा माल चोरी झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

कस्टम विभागाने १४ ऑक्टोबर २०२० रोजी एक संशयित कंटेनर पकडला होता त्या मध्ये महिलांचे आणि पुरूषांचे कपडे असल्याचे भास–वून त्या कंटेनरमधून लपवून सिगारेट आणली होती. कस्टम विभागाने कंटेनर स्कॅन केल्या नंतर त्यामध्ये सिगारेट असल्याचे आढळल्याने हा कंटेनर जप्त करून तो स्पिडी गोदामात ठेवला होता मात्र कस्टम अधिकाऱ्यांनी तो खोलून पाहिले असता त्याच्यातील निम्मे कार्टून चोरीला गेल्याचे आढळून आले. अशा प्रकारे आणखी चार कंटेनर फोडून यातील मालाची चोरी झाली असल्याचे कस्टमच्या अधिकाऱ्यांना निदर्शनास आल्या नंतर त्यांनी या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली आहे. यामध्ये अंदाजे ५० लाख रूपये किंमतीचे लेडीज, जेन्टस गारमेंट व संशयित सिगारेट, जॅकेट मार्कर आणि फुटवेअर आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची चोरी करण्यात आली आहे. या प्रकरणी कस्टम विभागाचे अप्रेजिंग ऑफिसर बेनेडीक्ट जॉर्ज यांनी न्हावा शेवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिस ठाण्यात ५० लाख मालाची चोरी झाल्याची तक्रार नोंदविण्यात आली असली तरी प्रत्यक्षात मात्र कोट्यावधी रूपयाच्या मालाची चोरी झाली असल्याचे येथिल कर्मचारी दबक्या आवाजात बोलत आहेत.

स्पिडी सिएफएस मध्ये कस्टम विभागाकडून जप्त करण्यात आलेले कोट्यावधी रूपये किंमतीचा माल येथे साठवून ठेवला जातो. मात्र स्पिडी सिएफएस च्या ढिसाळ व्यवस्थापनामुळे या गोदामातून अनेक वेळा कोट्यावधी रूपये किंमतीचा माल चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. डिसेंबर २०२० मध्ये देखिल या गोदामातून कोट्यावधी रूपये किंमतीचे विलायती सिगारेट गुंडग गरम चोरण्यात आले होते. या चोरीच्यावेळी स्पिडी च्या काही कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली होती. पोलिसांनी त्यावेळेला यातील काही सिगारेटचा साठा पुन्हा हस्तगत केला होता मात्र या प्रकरणाचा तपास पुढे सरकलाच नाही. तसेच या गोदामातून अनेक वेळा कस्टम विभागाने जप्त केलेल्या रक्त चंदनाची देखिल चोरी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे जेएनपीटीचा हे गोदाम म्हणजे चोरांसाठी आंदण दिले असल्याची चर्चा येथे जोर धरू लागली आहे.

# तळा येथे पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर उपलब्ध करण्याची बळीराजा शेतकरी संघटनेची मागणी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा येथे पशुधन विकास (विस्तार) अधिकारी (डॉक्टर) उपलब्ध करावा यासाठी बळीराजा शेतकरी संघटने तर्फे गटविकास अधिकारी तळा यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यातील तळा,सोनसडे, महागाव अशी गुरांची तीन दवाखाने असुन त्यातएकही डॉक्टर नसल्याने जनावरांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्याबाबत समन्वक समीतीत तळा प्रेस संघटनेनी मागणी करूनही आज पर्यंत पशुधन जपण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.



सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्यामुळे गुरे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. पशु वैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर उपलब्ध नसल्याने गुरांवर वेळीच उपचार होत नाहीत व यामुळे गाई, म्हशी, शेळ्या, इत्यादी पाळीव प्राणी मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. तळा तालुका डोंगराळ दुर्गम असून शेती एकमेव व्यवसाय आहे. शेती पुरक व्यवसाय दुग्ध व्यवसाय, शेळी पालन, कुकुट पालन करीत उदरनिर्वाह करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय करत असताना जनावरांच्या आजारपणात पशुवैद्यकीय दवाखान्याचा मोठा आधार असतो. परंतु तालुक्यात पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या दवाखान्यात शिपाई, व कंपाऊंडर ठेवलेले आहेत परंतु गुरांवर उपचार करणारे डॉक्टर नाहीत मग हे दवाखाने ठेवलेत तरी कशाला? असा सवाल केला जात आहे. तसेच जनावरांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत तर शेतकरी दुग्ध व्यवसाय कसा करणार असा संतप्त सवाल देखील शेतकऱ्यांच्या वतीने विच–ारला जात आहे. तसेच एक आठवड्याच्या आतमध्ये तालुक्यात डॉक्टर उपलब्ध केला नाही तर बळीराजा शेतकरी संघटने तर्फे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. याप्रसंगी संघटनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भास्कर गोळे, तळा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, नाशिर रहाटविलकर, राजेश गोठेकर यांसह तालुक्यातील अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॉटेलमधील रोख रक्कम चोरुन पळून गेलल्या वेटरचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील सागर रेस्टॉरंटमध्ये पाच दिवसांपूर्वी कामाला लागलेल्या एका वेटरने रेस्टारंटमधील ३५ हजाराची रोख रक्कम चोरुन पलायन केल्याची घटना उघडकिस आली आहे. हरिष श्रीगी असे या चोरट्यांचे नाव असून पनवेल शहर पोलिसानी त्याच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

पनवेल भागात राहणारे सचिन सचदेव यांचे पनवेल भागात सागर रेस्टॉरंट असून त्यांच्या रेस्टारंटमध्ये गत २५ जुलै रोजी आरोपी हरिष श्रीगी हा गेला होता. यावेळी त्याने रेस्टारंट मालक सचदेव यांना कामावर ठेवण्याची विनंती केली. आरोपी हरिष श्रीगी याने लॉकडाऊनपुर्वी सचदेव यांच्या न्यु पंजाब या हॉटेलमध्ये ३ महिने काम केले होते. त्यामुळे सचदेव यांचा त्याच्यावर विश्वास होता.

त्यामुळे सचदेव यांनी त्याला आपल्या रेस्टारंटमध्ये कॅप्टन म्हणून कामाला ठेवले. दरम्यान गत ३१ जुलै रोजी सायंकाळी रेस्टारंट बंद झाल्यानंतर रेस्टॉरंटमधील इतर वेटर हे किचनमध्ये असताना कॅशीयर सुब्रतो राय हा चहा पिण्यासाठी बाहेर गेला होता.

यावेळी सुब्रतो राय याने हरिष श्रीगी याला लक्ष ठेवण्यास सांगितले होते. याचदरम्यान, चोरट्या हरिष श्रीगी याने रेस्टारंटच्या गल्ल्यामध्ये जमा असलेली ३५ हजाराची रक्कम चोरुन पलायन केले. त्यानंतर रात्री ८.३० वाजता कॅशीयर सुब्रतो राय हा रेस्टारंटमध्ये परतल्यानंतर त्याने रेस्टारंटच्या गल्ल्यातील रक्कम मोजली असता, त्यात ३५ हजार रुपये कमी असल्याचे आढळुन आले. तसेच त्याठिकाणावरुन हरिष श्रीगी हा देखील पळून गेल्याचे लक्षात आले. त्यानेच रेस्टारंटच्या गल्ल्यातील रक्कम चोरुन नेल्याचे लक्षात आल्यानंतर सचदेव यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.

# पुरग्रस्तांना महाराष्ट्र अंनिस रायगड टिमची मदत ; साफसफाई व आवश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील महाड व पोलादपूर तालुक्यातील अनेक गावांना अतिवृष्टी व महापुराचा फटका बसला. रायगड जिल्हा महाराष्ट्र अंनिसच्या पनवेल, माणगाव व इतर शाखांच्या कार्यकर्त्यांनी नुकतेच पुरग्रस्तांना आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्याबरोबरच येथील घरांची साफसफाई देखील केली आहे.

येथील घरांचे साफसफाईचे काम केल्यावर दोन वस्त्यांना भेट देण्यात आली. त्यानंतर कोळ बौध्द वाडा येथे भेट दिली. तसेच येथील विविध कुटुंबाची विचारपूस करून त्यांना मानसिक आधार देण्यात आला. त्यांना खाऊ, सॅनिटरी पॅड, बीटेक्स आणि पायाला लावण्याचे तेल आदी साहित्याचे वाटप केले. यावेळी प्रभाकर नाईक, विनयकुमार सोनवणे, आरती नाईक, प्रा. डॉ. भगवान लोखंडे, महेंद्र नाईक, वैभव, प्रियांका, प्रा. कुटेवाड, नूरखान पठाण व विविध शाखेचे युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

---

मा.मुजावर सो

प्रो.जमा.६–२५ | अर्जदाराचे वकील अॅड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९६६/२०२१
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.धर्मीबाई परशुराम म्हात्रे
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.अनिल परशुराम म्हात्रे
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : शेती
रा. घर नं.५७६, दगडू निवास,
सेक्टर १४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.परशुराम दगडू म्हात्रे हे दि.७/०२/२०२१ रोजी मौजे : घर नं.५६६, आगरी समाज हॉल समोर, सेक्टर १४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे व सहहिस्सेदार ह्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | कामोठे–२३ | १७१ | २ | ०–०५–८ |
| | | १७१ | ३ | ०–०३–३ |
| | | १७३ | २ | ०–७–३ |
| | | १७३ | ३ ब | ०–१३–४ |
| | | १७५ | ३ | ०–९–६ |
| | | १८७ | ६ | ०–४–६ |
| | | १८९ | ४ | ०–१८–५ |
| | | ४४ | ४ | ०–५–३ |
| | | ४५ | ४ ब | ०–१३–९ |
| | | ५३ | ४+६ ब | ०–८–३ |
| | | ६१ | ७ पै | ०–००–३ |
| | | ६२ | २ पै | ०–०४–३ |
| | | ६२ | ३ पै | ०–००–५ |
| | | ६४ | ४ अ + ६ पै | ०–०८–१ |
| | | ६५ | ११ | ०–०६–० |
| | | ६८ | ७ | ०–०८–० |
| | | ६८ | २० | ०–२०–० |
| | | ७३ | १ | ०–२७–५ |
| | | ७३ | ८ ब | ०–१३–९ |
| | | ७३ | ९ | ०–१२–६ |
| | | ७४ | ८ पै | ०–१२–८ |
| | | ८४ | ३ | ०–१२–६ |
| | | ८५ | ३–७–४–५ अे / ११–१२–१५–१६ | ०–४५–७ |
| | | १३१ | ६ | ०–९–९ |
| १ | कामोठे–२३ | १३७ | ५ | ०–०२–३ |
| | | १३९ | ६ | ०–०४–८ |
| | | १३९ | १० | ०–०८–६ |
| | | १४५ | ७ | ०–०५–६ |
| | | १५० | २ | ०–०३–० |
| | | १५२ | २+४+५ | ०–२७–० |
| | | १५३ | १ | ०–०२–८ |
| | | १५६ | ३ | ०–०२–० |
| | | ३६४ | १ | ०–०८–० |
| | | ८४ | १ ब | ०–१४–७ |
| २ | कामोठे–२३ ब | २०० | १२ | ०–१०–० |
| ३ | कामोठे २३ (१) | ८३ | ४ ब | ०–०५–८ |
| | | ८३ | ७ | ०–०६–६ |
| | | ८२ | ८ | ०–०६–० |
| | | ८२ | ७ | ०–०५–८ |
| ४ | कामोठे २३ (२) | ८२ | ५ | ०–०८–४ |
| | | ७९ | १+२ अ | ०–०८–१ |
| | | ७५ | २+३+११+१४+ १६ ते १८ अे | ०–३३–९ |
| ५ | कामोठे/१५३ | ६८ | १ | ०–१०–० |
| | | १५० | ३ | ०–०७–५ |
| ६ | कामोठे/१५५ | ८५ | १+२ / C | ०–११–० |
| | | १५० | ५ | ०–०३–० |

कै.परशुराम दगडू म्हात्रे ह्याचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.मुजावर सो

प्रो.जमा.६–२५ | अर्जदाराचे वकील अॅड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९६९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०९/२०२१

१) श्रीमती.मंजुळा तुकाराम भोईर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुरेखा विलास भगत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.ललिता सखाराम पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.अशोक मुकूंद जोशी चे वारस
४/१) कु.प्रतिक्षा अशोक जोशी
वय : २३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.प्रियंका जयश पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्रियिंका अशोक जोशी
वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.लक्ष्मण नागू जोशी हे दि.०९/०७/१९८७ रोजी अवटे बिल्डींग, पहिला मजला, गनपावडर रोड, मझगाव, मुंबई येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भेंडखळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| भेंडखळ ९/८६ | ३५४ | – | ११–८९–०० |

कै.लक्ष्मण नागू जोशी ह्यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.मुजावर सो

प्रो.जमा.६–२५ | अर्जदाराचे वकील अॅड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९६७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.मंजुळा तुकाराम भोईर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुरेखा विलास भगत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.ललिता सखाराम पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.अशोक मुकूंद जोशी चे वारस
४/१) कु.प्रतिक्षा अशोक जोशी
वय : २३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.प्रियंका जयश पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्रियिंका अशोक जोशी
वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.चंद्राबाई नागू जोशी ही दि.०९/०७/१९८७ रोजी अवटे बिल्डींग, पहिला मजला, गनपावडर रोड, मझगाव, मुंबई येथे तीचे राहत्या घरी मृत्यू पावली असून तीचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भेंडखळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| भेंडखळ ९/८६ | ३५४ | – | ११–८९–०० |

कै.चंद्राबाई नागू जोशी हिचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.मुजावर सो

प्रो.जमा.६–२५ | अर्जदाराचे वकील अॅड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.मंजुळा तुकाराम भोईर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुरेखा विलास भगत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.ललिता सखाराम पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.अशोक मुकूंद जोशी चे वारस
४/१) कु.प्रतिक्षा अशोक जोशी
वय : २३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.प्रियंका जयश पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्रियिंका अशोक जोशी
वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.काशीबाई नागू जोशी ही दि.१६/०४/२००२ रोजी मौजे ए/१०३, श्री सुर्यकूंद महापुरुष को.ऑप.हौ.सो. गनपावडर रोड, मझगाव, मुंबई येथे तीचे राहत्या घरी मृत्यू पावली असून तीचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भेंडखळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| भेंडखळ ९/८६ | ३५४ | – | ११–८९–०० |

कै.काशीबाई नागू जोशी हिचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# सुरदास गोवारी यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीद्वारे संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सूरदास गोवारी यांचा वाढदिवस कामोठे येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करून तसेच गरजवंतांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून सामाजिक बांधिलकीद्वारे संपन्न झाला.

रायगडच्या पालकमंत्री ना.कु. आदितीताई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ.प. दामाजी गणपत गोवारी विद्यालय, कामोठा से.-८ येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व नवी मुंबई शहर निरीक्षक प्रशांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस व पनवेल शहर निरीक्षक भावना घाणेकर, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष व नगरसेवक सतिश पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष शिवदास कांबळे, नगरसेवक विजय खानावकर, जिल्हा उपाध्यक्ष आजिनाथ सावंत, बबन पवार, ओबीसी जिल्हाध्यक्ष राजूभाई मुलानी, जिल्हा युवाध्यक्ष प्रमोद बागल, विधी-सेल जिल्हाध्यक्ष पवनकुमार गायकवाड, जिल्हा विद्यार्थी अध्यक्ष तुषार सावंत, महिला सरचिटणीस जयश्री देसाई, युवा कार्याध्यक्ष शहाबाज पटेल, उपाध्यक्ष कासमभाई मुलानी, सेवादल अध्यक्ष उद्धव पवार, कामोठे शहराध्यक्ष चंद्रकांत नवले, डॉक्टरसेल अध्यक्ष अमोल कांबळी, शहर कार्याध्यक्ष अमोल बोडके, उपाध्यक्ष अनंत वारे, दत्तात्रय सावंत, स्वप्निल कातकर, हेमंत पवार, नितीन जाधव, राहूल यमगर्णी, प्रकाश आंगणे, संदेश कोठेकर, शैलेश लोंढे, अंकुश ढवळे, नागेश पवार, महेंद्र पाटील, किशोर मुंढे, राहूल यादव आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांनी त्याठिकाणी येऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सूरदास गोवारी यांची मुलगी डॉक्टर परिक्षा यशस्वी झाल्याबद्दल तिचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न : आ. भरत गोगावले



**दै.रायगड नगरी । महाड**

महापुरानंतर विस्कळीत झा-लेले जन जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न सुरु असल्याची माहिती महाडचे आमदार श्री. भरत गोगावले यांनी दिली.

पुरामुळे बाधित झालेल्या पत्रकारांना नगरविकास मंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी आथिक मदत उपलब्ध करुन दिली. या मदतीचे वितरण आ. भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.

तळीये येथील दरड दुर्घटनेत ८४ जणांचा झालेला मृत्यु ही मन हेलावून टाकणारी घटना आहे. या दुर्घटनेत विस्थापित झालेल्या नागरिकांचे याच परिसरात तात्पुरते पुनर्वसन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न देखील लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठी आपण सातत्यपूर्ण पाठपुरावा करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

महाड बाजारपेठ या महापुरात पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. शहरातील साफसफाईचे आव्हान मोठे होते. या कामासाठी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यानी ठाणे नगरपालिकेची अत्याधुनिक सफाई यंत्रणा उपलब्ध करुन दिल्याने हे काम वेगाने पूर्ण झाले. त्यांच्या प्रयत्नांना विविध महानगरपालिका आणि नगरपालिकांची मोलाची साथ मिळाल्याचे ते म्हणाले. व्यापारी आणि शहरातील इतर व्यावसायिकांचे झालेले नुकसान विचारात घेता त्यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळावी यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. यावेळेस पत्रकारांना आथिक मदत देण्याबरोबर पुरात सर्वकाही वाहून गेलेल्या तीन पत्रकाराना आ. गोगावले यांनी भांडी आणि अन्य साहित्याचीही मदत केली.

# एसटी मधील प्रवाशाचा मोबाईल चोरणाऱ्या दोन चोरट्यांना प्रवाशांनी पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गर्दीचा फायदा उचलत एसटी बस मधील एका प्रवाशाचा मोबाईल फोन चोरुन पळुन जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन चोरट्यांना एसटीमधील प्रवाशांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना सोमवारी सायंकाळी पनवेल एसटी स्टँडमध्ये घडली. ईरशाद राऊफ अन्सारी (३०) व शमरुद्दीन जमालुद्दीन अन्सारी (४४) अशी या चोरटय़ांची नावे असून पनवेल शहर पोलिसांनी या दोघांवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून चोरीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

या घटनेतील तक्रारदार दुखीश्याम दास (२६) हा खोपोली येथे मित्रासह रहाण्यास असुन सोमवारी तो व त्याचा मित्र नवी मुंबईत कामानिमित्त आले होते. त्यानंतर दोघे नेरुळ येथून एसटीने पनवेल एसटी स्टँड येथे गेले. त्याठिकाणी खोपोलीला जाणारी एसटी लागल्यानंतर दुखीश्याम व त्याचा मित्र स्वराज या दोघांनी गर्दीतून सदर एसटी बस पकडण्याचा प्रयत्न केला. यावेळी एसटी बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांची गर्दी असल्याचा फायदा उचलत आरोपी ईर्शाद अन्सारी याने दुखीश्यामच्या खिशातील व्हीओ कंपनीचा मोबाईल फोन चोरला. मात्र दुखीश्यामला हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्याने चोरट्या ईर्शादकडे मोबाईलबाबत विचारणा केली. त्यामुळे चोरट्या ईर्शादने चोरलेला मोबाईल फोन आपला साथिदार शमरुद्दीन अन्सारी याच्याकडे दिला.

त्यानंतर दोघांनी एसटी बसमधुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता, दुखीश्याम याने आरडा-ओरड केली. त्यामुळे इतर प्रवाशांनी या दोघा चोरटय़ांना पकडुन दोघांना बेदम मारहाण केली. त्यानंतर दोघांना पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी दोघा आरोपींची झडती घेतली असता, त्यांच्याकडे दुखीश्याम याच्याकडून चोरलेला मोबाईल फोन आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी दोघांवर चोरीचा गुन्हा दाखल करुन दोघांना अटक केली आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेले दोघे चोरटे भिवंडी येथे राहण्यास असून दोघेही रिक्षा चालवत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बोर्लीतील बहुतांशी लोक आजही लसीकरणापासून वंचित? प्राथमिक आरोग्य केंद्राचा ढिसाळ कारभार

## गावासाठी स्वतंत्र लसीकरणा केंद्र व्हावे : सरपंच चेतन जावसेन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वत्र लसीकरण मोहिम राबविण्यात येत असून रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरणात ढिसाळ कारभाराबाबत पंचक्रोशीतील अनेक नागरिक आजही लसीकरणापासून वंचित असून गावासाठी स्वतंत्र लसीकरण केंद्र व्हावे.अशी मागणी सरपंच चेतन जावसेन यांनी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

बोर्ली मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत लसीकरणात सुरुवातीला लस वाटपात गौडबंगाल होत असल्याचे समोर आले आहे. लस घेणा-यांची यादी संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत मोबाईल/फोन द्वारे आधीच तयार करण्यात येत होती.त्यामुळे बोर्ली गावातील लसीकरण अत्यंत कमी प्रमाणात झाले असल्याचा प्रकार सरपंच चेतन जावसेन व सदस्य गणेश कट यांनी उघडकीस आणला होता.त्यानंतर ते नागरिकांना लसीकरणाबाबत सोशल मीडिया व फोन द्वारे माहिती देण्यात प्रयत्नशील व लसीकरणासाठी नावनोंदणी वर लक्ष ठेवून होते. बोर्ली मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात दि.५ ऑगस्ट रोजी लस उपलब्ध झाली.परंतु याची कोणतीही माहिती सरपंच चेतन जावसेन यांना देण्यात आली नाही.त्यामुळे लसीकरण सुरू झाल्याची माहिती गावातील नागरिकांपर्यंत पोहोचू शकली नाही. मात्र लसीकरणासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात बाहेरून आलेल्या लोकांची गर्दी दिसून आली.याचाच अर्थ गावातील लोकांना लसीकरणापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते काय ? असा सवाल उठत आहे. सद्यस्थितीत, गेल्या महिनाभरापासून बोर्ली ग्रामपंचायत हद्दीत एकही कोविड रुग्ण आढळून आला नाही व पुढील काळात कोरोना महामारी हद्दपार करण्यासाठी सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, सदस्य प्रयत्नशील आहेत. मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राकडून अपेक्षित साथ मिळत नसल्याबद्दल खंत व्यक्त होत असून चौकशीची मागणी केली जात असून गावातील लसीकरणासाठी स्वतंत्र लसीकरण केंद्र व्हावे.अशी मागणी चेतन जावसेन यांनी केली आहे.


मा.मुजावर सो

प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
अॅड.विजय गडगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९७१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०९/२०२१

१) श्रीमती.मंजुळा तुकाराम भोईर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.सुरेखा विलास भगत
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.ललिता सखाराम पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.अशोक मुकूंद जोशी चे वारस
४/१) कु.प्रतिक्षा अशोक जोशी
वय : २३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.प्रियंका जयश पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्रियिंका अशोक जोशी
वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.नागू बाळा जोशी हे दि.३०/१२/१९८२ रोजी श्री सुर्यकूंद बिल्डींग, मझगाव, मुंबई येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळाघोडा, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | काळाघोडा | १४ | ३ | ०-२२-९० | |
| | | ६६ | २ | ०-६०-२० | |

कै.नागू बाळा जोशी ह्यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेबांचे कोर्ट

अॅड.भुषण म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९४७/२०२१
नि.नं.८
ने.ता.१७/०९/२०२१

कै.चिंतामण सिताराम केदारी मयतचे वारस
१) श्रीमती.गंगुबाई चिंतामण केदारी
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.मिनाक्षी राजेश घरत
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.जासई, ता.उरण, जि.रायगड
३) श्री.देवेंद्र चिंतामण केदारी
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.उत्तम चिंतामण केदारी
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.मंगेश चिंतामण केदारी
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती
१ व ३ ते ५ रा.मु.पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. चिंतामण सिताराम केदारी ह्यांचे निधन दि.२०/०४/२०२१ रोजी मु.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच त्यांची आई कै.जानकुबाई सिताराम केदारी यांचे निधन दि.१९/०१/२०१६ रोजी मु.पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून तसा दि.चौ.अर्ज नं.९८२/२०१८ हा देखील मे.कोर्टातून घेतलेला आहे. कै.चिंतामण सिताराम केदारी यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकत नं.अ**
**मौजे : पारगाव डुंगी, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पारगाव डुंगी | ३८ | ५ | ०-२२-४ | |
| | ९ | ७ | ०-२९-६ | |

वरील संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. चिंतामण सिताराम केदारी यांना सिडकोकडून मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड येथे फाईल नं.९४, सेक्टर नं.८, भूखंड नं.९४, क्षेत्र ८२० चौ.मी. आहे.

**मिळकत नं.ब**
**मौजे : पारगाव, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पारगाव | ९८ | ६ क | ०-१२-१० | २.७७ |
| | ९८ | ६ अ | ०-०५-५० | १.२६ |

वरील संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे यांना भूखंड वितरित करण्यात आला आहे. तसेच जमीन मिळकती देखील आहेत. श्रीमती.गंगुबाई चिंतामण केदारी वगैरे हे कै.चिंतामण सिताराम केदारी यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.गंगुबाई चिंतामण केदारी, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.चिंतामण सिताराम केदारी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



# Kamalgauri Hiru Patil Shikshan Sanstha

Plot No. 29, Sector-11Taloja, CIDCO Node, Navi Mumbai-410208

**WALK IN INTERVIEW**

Applications are invited for the following post of Assistant professor in various following institute for the academic year 2021-22

## S.V.COLLEGE OF ARTS COMMERCE & SCIENCE

Affiliated to University of Mumbai

| Subject | Designation | No. of Post | Nature of Post | Eligibility |
|---|---|---|---|---|
| | Principal | 1 | Full Time | NET/ SET /Ph.D. 15 yearsTeaching Experience |
| Economics | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Geography | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| History | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Physics | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET /Ph.D. |
| Botany | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Chemistry | Asst. Professor | 06 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Commerce | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Accounts | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Information Technology | Asst. Professor | 06 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Management | Asst. Professor | 03 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| | Librarian | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Mathematics | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET / Ph.D. |
| English | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET /Ph.D. |
| Marathi | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET / Ph.D. |
| **Non teaching Staff** | | | | |
| | | 01 | Full Time | Any Post Graduation |
| Accountant | | 01 | Full Time | B.Com. GDC & A |
| Clerk | | 04 | Full Time | Graduation & Typing |
| Peon | | 04 | Full Time | 10th pass |
| Lab assistant | | 02 | Full Time | B.Sc. |

## B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY

BACHELOR OF PHARMACY (B PHARMACY)
DIPLOMA OF PHARMACY (D PHARMACY)
(Affilliated to MSBTE,DTE,Appiroved by Pharmacy Act1948)

| Designation | Post | Qualification |
|---|---|---|
| Principal | 01 | M.Pharm PH.D.With 10Years Experience |
| Associate Professor | 03 | B.Pharm/M.Pharm(Experience /Fresher) |
| Laboratory technician | 01 | D.Pharm(Experience /Fresher) |
| Lab Assistant | 04 | B.sc (Experience /Fresher) |
| Office superintendent | 01 | Degree(Experience /Fresher) |

* Qualifications & Experiences per AICTE&PCI Norms respectively
Industrial Experience will also be considered
Note Candidate may mail their resumes to kghpss.2019@gmail.com

## Babandada Patil College of Nursing

Email : babankpatil100@gmail.com

Applications are invited for the following post of the Academic Year 2021 - 22. Qualified Candidate should present with original documents.

| Sr. No. | Post | No. Post | Eligibility |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | M.Sc. Nursing with 3 years of teaching experience or B.Sc. Nursing with 5 years of teaching experience |
| 2 | Vice Principal | 1 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing with 3 years of teaching experience |
| 3 | Tutor | 3 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing or Diploma in Nursing Education and Administration with 2 years of teaching experience |
| 4 | Additional Tutor for Interns | 2 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing or Diploma in Nursing Education and Administration with 2 years of teaching experience |

## BALASAHEB THACKERAY LAW COLLEGE

Affiliated to University of Mumbai

| Sr No. | Cadre | Subject | Total No.Of Post | Post Reserved For | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | OPEN | SE | ST | DT /NT | OBC | SEBC |
| 1 | Asst.Professor | Law | 18 | 10 | 03 | 01 | - | 04 | - |
| 2 | Labrarian | | 01 | 01 | - | - | - | - | - |
| 3 | Accountant | | 02 | 01 | 01 | - | - | - | - |

Note - Eligible Candidate should present with original documents. & Xerox Copy

**Contact**
9594535370
9322789977
9137174559

**Date of Interview: 13 and 14 / August 2021**

**Venue :** Plot No. 29, sect-11, Taloja Phase -1 Tal. Panvel Dist. Raigad

Chairman
**Shri. Baban Patil**
Kamalgauri Hiru Patil Shikshan Sanstha


# सुधागड मनसेकडून औषध, कपडे, धान्य, डाळी व भांड्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड सह कोकणात अतिवृष्टीने कहर माजविला. जनजीवन विस्कळीत झाले.

सुधागड मनसेतर्फे मागील आठवड्यात महाड येथे पुरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूची मदत करण्यात आली होती. तर नुकतेच येथील पूरग्रस्तांना मदतीची दुसरी खेप नेण्यात आली. यामध्ये औषध, कपडे, धान्य, डाळी व भांड्यांचे वाटप करण्यात आले. मनसे तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी सांगितले की पहिल्या वेळी मदतीसाठी गेल्यावर तेथील परिसर आम्ही फिरलो, त्यावेळी आमच्या लक्षात आले की आता येथे साथीचे आजार पसरण्याची शक्यता आहे. म्हणून साथीच्या आजारावरीलल औषधे देणे गरजेचे आहे. त्यानुसार आम्ही धैसरिया ट्रस्ट सोबत राजेश शिंगाडे यांच्या मार्फत संपर्क साधून औषधे उपलब्ध करुन घेतली. तसेच विविध मित्रमंडळींनी कपडे, चादर , तांदूळ, डाळी व भांडी यांची मदत केली आहे. या सर्व मदतीचे सुनिल साठे यांच्यासह विभाग अध्यक्ष केवल चव्हाण, गोरक्ष दळवी व राजु शेख आदी पदाधिकाऱ्यांनी वाटप केली.